**नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना पदस्थापना देण्याबाबत .....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः R&FD-15071/24/2026-MRF(DESKE9)**

मादाम काम मार्ग, हुतात्मा राजुगरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १७.०४.२०२६

**वाचा:-**

१) महसूल व वन विभागाचे समक्रमांकाचे आदेश दि.०९.०४.२०२६

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार, नायब तहसिलदार संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना वाचा येथील आदेशान्वये देण्यात आलेल्या पदस्थापनेत प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने अंशत: बदल करण्यात येवून सुधारीत पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नायब तहसिलदाराचे नाव | दि.०९.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेली पदस्थापना | अंशत: बदलाने सुधारित पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.रविराज अरूण जाधव | नायब तहसिलदार (संगायो), तहसिल कार्यालय फलटण, जि. सातारा | नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय खंडाळा, जि.सातारा या रिक्त पदावर |

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील. उपरोक्त नमूद अधिकारी यांनी सुधारित पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संबंधितांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करावा.

३. संबंधित अधिकारी बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत deske9-rfd@mah.gov.in या ई-मेलद्वारे /टपालाद्वारे शासनास त्वरित कळवावे.

४. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रूजू न झाल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांच्याविरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबधितांनी नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल, याचीही संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संबंधित अधिकारी बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी विहित कालावधीत रुजू न झाल्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

८. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

९. सदरहू आदेशानुसार बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी व गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४१७१३२८४७७५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.17 13:29:38 +05'30'

**(महेश वरूडकर)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

३) मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु., क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

६) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.

७) जिल्हाधिकारी, सातारा.
८) प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१०) संबंधित आहरण व वितरण.
११) संबंधीत अधिकारी (विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्यामार्फत)
१२) निवडनस्ती, कार्यासन आस्था-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२